# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 04/07/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### फसवणुक

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील सेनेघाट येथे दिनांक ०३/०७/२०२३ चे १०/०० वा. ते १०/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गोपीचंद टीकाराम हटवार, रा. सोनेघाट रामटेक हा आपले घरासमोर उभे असता मोटारसायकलवर दोन अनोळखी ईसम त्यांचे जवळ येवुन आम्ही पंचायत समीती रामटेक येथुन आलेले आहोत. माझे नाव रोकडे आहे तुम्ही गोपीचंद हटवार काय असे विचारले असता फिर्यादीनी होय म्हटल्यावर तुमच्या शेतीचा १,५०,०००/– रू. चा चेक आलेला आहे. त्या करीता तुम्हाला २५,०००/–रू. ते ३००००/–रूपये भरावे लागणार असे म्हणुन फिर्यादीकडुन १३,०००/– रूपये व काही कागदपत्रे व स्टॅम्पपेपर बनवायला पैशे लागणार म्हणुन फिर्यादीचे पत्नीचे १ तोळयाचे एकदानी किंमती अंदाजे २५,०००/– रू असे एकुण ३८,०००/– रू चा मुद्देमाल घेवुन गेले. फिर्यादी चेक बाबत विचारपुस करणे करीता पंचायत समिती रामटेक येथे गेले असता तेथे कोणीही रोकडे नावाचा ईसम नसल्याचे समजले. अशा प्रकारे फिर्यादीची २ अनोळखी ईसमांनी फसवणुक केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशि मंगेश सोनटक्के मो. नं. ९७६७३३१३५६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा, मनसर रामटेक येथे दिनांक ११/०४/२०२३ चे ११/०० वा. ते १६/०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– कॅनरा बॅक खातेधारक याने विविध ठिकाणचे खातेधारकाचे नावाचा वापर करून फिर्यादी नामे– श्री महिपाल नत्थुजी चौकसे, वय ६० वर्ष रा. नागपुर यांचे खात्यातील एकुण ३,१५,२८०/– रू. ऑनलाईन साधनाचा वापर करून फिर्यादीची व बॅक मॅनेजरची दिशाभुल करून आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ड) माहीती तंत्रज्ञान अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक यादव मो. नं. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**